# जीवन मार्ग

संस्थापक : आर. बी. मोरे

**संपादक**
डॉ. अशोक ढवळे

**कार्यकारी संपादक**
विजय पाटील

**संपादक मंडळ**
अजित अभ्यंकर
डॉ. विठ्ठल मोरे
डॉ. उदय नारकर
सुभाष थोरात
डॉ. रमेशचंद्र पाटकर
राजीव देशपांडे
शोभा ठेकेदत्त
हिरा जनार्दन
प्राची हातिवलेकर

**मुद्रक/प्रकाशक**
डॉ. अशोक ढवळे

**अक्षरजुळणी**
आत्माराम पडवळ

**मुखपृष्ठ व मांडणी**
केतन शिंदे

**व्यवस्थापक**
चंद्रकांत शिंदे

**प्रसिद्धी स्थळ**
'जनशक्ती', पी. बी. मार्ग
वरळी, मुंबई - ४०० ०१३
फोन : ०२२-२४९५१५७६
फॅक्स : ०२२-२४९६१५२५
ई मेल : mahacpim@gmail.com


# ट्रम्प यांच्या अध्यक्षपदाचे खरे रूप

**संपादकीय**

ट्रम्प यांनी अमेरिकेच्या अध्यक्षपदाची धुरा सांभाळल्याच्या पहिल्या दहा दिवसांत जर काही स्पष्ट झाले असेल तर हे की, त्यांनी निवडणूक प्रचारादरम्यान जनतेला जी आश्वासने दिली होती, ती ते नक्कीच पूर्ण करणार आहेत. डोनाल्ड ट्रम्प यांनी सुरुवातीलाच जे अनेक कार्यकारी आदेश जारी केले आहेत. ते आदेश त्यांची स्थलांतरितांविरोधी, इस्लामद्वेष्टी, बडे उद्योगधार्जिणी धोरणेच सिद्ध करतात.

यातील पहिला कार्यकारी आदेश आहे, तो म्हणजे मेक्सिको व अमेरिकेदरम्यानच्या सीमारेषेवर भिंत बांधणे. ट्रम्पसाहेबांच्या मते देशात बेकायदेशीर घुसखोरी करणाऱ्यांना यामुळे आळा बसेल. ही भिंत बांधण्याचा खर्च मेक्सिकोने करावा, असे विधान करून त्यांनी स्वत:च केलेल्या जखमेवर मीठ चोळण्याचे काम केले आहे. मेक्सिकोच्या पंतप्रधानांनी मात्र हा प्रस्ताव साफ धुडकावून लावला आहे. आता ट्रम्प प्रशासनाने त्यांना सरळ धमकीच दिली आहे की, तुम्ही तुमच्या खर्चाने जर भिंत बांधली नाही. तर आम्ही तुमच्या देशातून अमेरिकेत आयात होणाऱ्या वस्तूंवर २० टक्के कर बसवून हा भिंत बांधण्याचा खर्च वसूल करू.

ट्रम्प यांनी 'कीस्टोन एक्स एल' आणि 'डाकोटा ॲक्सेस पाईपलाईन' अशा दोन पाईपलाईन' योजना, ज्या बाजूला सारण्यात आल्या होत्या. त्यांचा पुनर्विचार करण्याचाही एक आदेश जारी केला आहे. या दोन्ही योजनांना पर्यावरणवादी तसेच अमेरिकन मूलनिवासी यांचा प्रखर विरोध आहे. मात्र ट्रम्प या योजना सुरू करून प्रभावी तेल गॅस लॉबीची धन करू पहात आहे.

मात्र, ट्रम्प यांनी काढलेला सर्वात धक्कादायक आदेश म्हणजे सात मुस्लीम देशांतील नागरिकांना अमेरिकेत प्रवेश करण्यावर घातलेली बंदी. इराण, इराक, सीरिया, सुदान, लिबिया, येमेन आणि सोमालिया या सात देशांतील नागरिकांना अधिकृत व्हिसा असला तरीही अमेरिकेत प्रवेश करण्याकरता नव्वद दिवसांची बंदी घालण्यात आली आहे. या आदेशान्वये इतर निर्वासितांना १२० दिवसांची तर सिरियातील निर्वासितांवर अनिश्चित काळाची बंदी घालण्यात आली आहे. मात्र त्याच वेळी व्हाईट हाऊसने इराक आणि सिरियातून आलेल्या ख्रिश्चन निर्वासितांना मात्र प्रवेश देऊ केला आहे. वरील देशांतून आलेल्या शेकडो नागरिकांना वैध व्हिसा असून देखील अमेरिकन विमानतळांवर येताच स्थानबद्ध करण्यात आले.

या उघडपणे घेतलेल्या मुस्लीम-विरोधी भूमिकेचा जगभरातून निषेध होतो आहे. अमेरिकेचे युरोपातील साथीदार जर्मनी आणि फ्रान्स या देशांनीही या धोरणावर टिका केली आहे. खुद्द अमेरिकेत या बंदीला घटनाबाह्य तसेच अ-अमेरिकन असल्याचे सांगत अनेक प्रमुख शहरांतील विमानतळांबाहेर मोठ्या प्रमाणावर लोकांनी निदर्शने केली.

सूचक गोष्ट अशी की, 'आयसिस' या मुस्लीम धर्मांध संघटनेने मात्र या निर्णयाचे स्वागत केले आहे. अमेरिकन अध्यक्षांची ही मुस्लीमविरोधी भूमिका म्हणजे अमेरिकेला मुस्लिमांनी त्यांच्या देशात रहाणे मान्य नाही, हाही जिहादी, दहशतवादी संघटना नेहमी करत असलेला आरोप सिद्ध करणारी आहे. त्यामुळेच तिने या निर्णयाचे स्वागत केले, हे उघड आहे.

ट्रम्प आपली 'सर्वप्रथम अमेरिका' (प्रथम प्राधान्य अमेरिकेला) ही नीती देखील लागू करत आहेत. निवडणूक प्रचारादरम्यान दिलेल्या आश्वासनानुसार त्यांनी 'ट्रान्स पॅसिफिक (टीपीपी)' मधून भागीदारी काढून घेतली आहे. जपान, ऑस्ट्रेलिया व एशिआन-१२ देशांचा समावेश असलेला हा प्रस्ताव ओबामा प्रशासनाकडून मांडण्यात आला होता. या प्रस्तावाचा एक महत्वाचा उद्देश चीनला वेगळे पाडणे तसेच त्यांच्यावर अंकुश ठेवणे हा होता. हा प्रस्ताव तसेच युरोपीय संघ आणि अमेरिका यांच्यातील 'ट्रान्स ॲटलांटिक व्यापारी व गुंतवणूक भागीदारी' यामुळे उद्योगपतींच्या सामर्थ्यात वाढ झाली असती, तसेच संबंधित देशांभोवती आर्थिक फासही आवळला गेला असता.

आपल्या सार्वभौमत्वाच्या बदल्यात त्यांना भांडवलदारांपुढे मान तुकवावी लागली असती. एवढेच नव्हे तर या सर्व देशांमुळे जर गुंतवणुकीवर विपरीत परिणाम झाला. तर त्याकरता या देशांना कायद्याने जबाबदार धरता आले असते.

या 'ट्रान्स पॅसिफिक प्रस्तावा'चे बारगळणे अमेरिकन उद्योगपती व कॉर्पोरेटसच्या एका गटाच्या हिताला बाधक ठरले असले, तरी ट्रम्प यांनी टॅक्सच्या दरात कपात व इतर तत्सम सवलतींची भेट देण्याचे आश्वासन त्यांना दिले आहे. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या एका बैठकीत त्यांनी निवडणुकीदरम्यान दिलेल्या कॉर्पोरेट कर आकारणीचा दर ३५ टक्क्यांवरून १५-२० टक्क्यांवर आणण्याच्या आपल्या आश्वासनाची पूर्तता करण्यात येईल, असे आश्वासन दिले.

हे सर्व कार्यकारी आदेश बघता मोदी सरकारला आता निव्वळ बघ्याची भूमिका घेण्याव्यतिरिक्त काही भूमिका उरली नाही. ट्रम्प यांच्या विजयाचे नरेंद्र मोदी आणि भाजपने स्वागत केले होते. त्यांना ट्रम्प यांच्या व्यक्तिमत्वात आपला राजकीय व वैचारिक जोडीदार दिसला होता. ट्रम्प यांचा मुस्लिमद्वेष तर त्यांना फारच भावला होता.

मात्र ट्रम्प प्रशासनाने अगदी अलिकडे उचललेली पावले भारताला चिंतेत टाकणारी आहेत. ट्रम्प यांनी एचबी-१ व्हिसावर तसेच माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील नोकऱ्यांकरता भारतातून अमेरिकेत जाणाऱ्यांवर मर्यादा आणण्याचे संकेत दिले आहेत. भारतातील माहिती तंत्रज्ञान कंपन्यांचे समभाग झपाट्याने पडले असून पहिल्या पाच कंपन्यांच्या बाजारमूल्यात ३३,००० कोटी रुपयांची घसरण झाली आहे.

अमेरिकेशी डावपेचात्मक संधान जुळवल्याचे फळ मोदी सरकारला आता भोगावे लागण्यास सुरुवात झाली आहे. राष्ट्राध्यक्ष ओबामा यांचा आशिया खंडातील बिनिचा शिलेदार बनून अमेरिकेच्या भू-राजकीय धोरणांतील कनिष्ठ सहयोगी (छोटा भाऊ) बनण्याचा मान मिळाल्यानंतर, मोदी सरकारला आता त्या ट्रम्प प्रशासनाचा सामना करावा लागणार आहे. ज्याला ओबामा सरकारच्या धोरणात्मक दृष्टीकोनांकडे बघण्यात रस नाही. ट्रम्प यांचे संरक्षणवादी तसेच अतिरेकी राष्ट्रवादी प्रशासन भारताला भेडसावत असलेल्या चिंतेला भाव देण्यास मुळीच इच्छुक नाही.

भारताला आता आपले परराष्ट्रीय धोरण व्यापक करावे लागणार असून जी विविध समीकरणे पुढे येत आहेत, त्यात सहभागी व्हावे लागणार आहे. यातील सर्वात महत्वपूर्ण आहेत, आशियातील देश, ऑस्ट्रेलिया, चीन, जपान, दक्षिण कोरिया आणि न्यूझीलंड यांचा सहभाग असलेली प्रादेशिक व्यापक आर्थिक भागीदारी (आरसीईपी). या मुक्त व्यापार अभिप्रेत असलेल्या प्रस्तावात अमेरिकेचा सहभाग नाही. भारताला आता 'ब्रिक्स' तसेच 'शांघाय को-ऑपरेशन' या संस्थांमध्येही आपली भूमिका वाढवावी लागणार आहे. आपण आता आपली चीनने पुढाकार घेतलेल्या 'एक प्रदेश, एक मार्ग' (onebelt, oneroad) या योजनेविषयी असलेली नकारात्मक भूमिका बदलायला हवी.

आपले आर्थिक व धोरणात्मक संबंध व्यापक करून आणि विविध मंचांवर सक्रिय सहभाग नोंदवूनच भारताला आपले परराष्ट्रीय धोरण पुन्हा प्राप्त करता येणार आहे. मात्र, मोदी आपल्या अमेरिका प्रेमाचा त्याग करून, आपली दिशा बदलणार का? हा खरा कळीचा मुद्दा आहे.

★ ★ ★

---

## (महा-जना पदयात्रा... पान १२ वरून)

मागासवर्गीय म्हणून नोंदवलेले गेले नाहीत, असेही पदयात्रेच्या दरम्यान सामोरे आले. असे काही पुढे आलेले महत्वाचे मुद्दे येथे नोंदवले आहेत. ताम्मीईनेनी वीरभद्रम यांनी मुख्यमंत्र्यांना आणि इतरही संबंधित मंत्र्यांना व खात्यांना खेड्यापाड्यातील लोकांच्या या सर्व परिस्थितीची जाणिव देणारी पत्रे पाठविली आहेत.

पदयात्रा दररोज सकाळी आठ वाजता सुरु व्हावयाची आणि दिवसाला सरासरी २४ किमी चालून रात्री ९-१० वाजता थांबायची. मुख्य पदयात्रा खेड्यात पोहोचायच्या आधी एक गट आधीच जाऊन तेथील प्रश्नांची माहिती घ्यायचा. हा गट त्या गावातील विविध सामाजिक-राजकीय नेत्यांना भेटायचा व त्यांचा पाठींबा मिळविण्याचा प्रयत्न करायचा. त्यामुळे गावातील विविध राजकीय बांधिलकीचे नेते गावात आयोजित केलेल्या सभेत भाग घेत असत. पदयात्रेत अनेक लिखीत निवेदने येत. या निवेदनांची छाननी करून जिल्हा कमिटीचे जे सभासद पदयात्रेशी संबंधित होते त्यांच्याकडे पाठविली जात. त्यांना पदयात्रेदरम्यान मिळालेल्या या निवेदनांना प्रतिसाद देणे बंधनकारक होते. ते जिल्हा कमिटी सभासद त्या त्या संबंधित खात्याकडे त्या निवेदनातील प्रश्नांचा पाठपुरावा करत. जिल्हा प्रशासनाच्या पातळीवर निवेदनातील प्रश्नांचा काय तडा लागला? याचा साप्ताहिक अहवाल दिला जात असे. बऱ्याचशा खेड्यात पक्षशाखा नव्हत्या. तरीही स्थानिक लोक मोठ्या प्रमाणावर पदयात्रेत सामील होत होते ही उत्साहीत करणारी गोष्ट होती.

या पदयात्रेत मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे प्रमुख नेते तर सहभागी होतेच पण त्याचबरोबर अनेक महत्वाची राजकीय व्यक्तीमत्वे पाठिंबा देत पदयात्रेत सहभागी झाली. तेलंगणा संयुक्त कृती समितीचे प्रा. कोन्डाना राम, एमआरपीएस अध्यक्ष मंदा कृष्णा मादिगा, टीडीपीच्या रेवती रेड्डी, आमदार आणि दलित नेते आर. कृष्णय्या, टीडीपीच्या पॉलिट ब्युरोचे सदस्य रावूलू चंद्रशेखर रेड्डी, माजी आमदार के. दयाकारा रेड्डी, वरिष्ठ काँग्रेस नेते कोदंडा रेड्डी, लांबाडा हक्क्लू पोराता कमिटीचे अध्यक्ष बेलया नाईक, डीबीएफ अध्यक्ष शंकर, आंबेडकर युथ ऑर्गनायझेशनचे मासाए आणि इतर पदयात्रेत सहभागी झाले व पाठिंबा दिला. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे जनरल सेक्रेटरी सिताराम येचुरी, पॉलिट ब्युरो सभासद व्ही. श्रीनिवास राव, सीटू अध्यक्ष आर. हेमलता, जनमसंच्या सरचिटणीस मरियम ढवळे, एआयएडब्ल्यू कार्यकारी कमिटीचे सभासद व्ही. कोंडुरी इत्यादी नेते आतापर्यंत पदयात्रेत सामील झालेले आहेत.

**(अनुवाद : राजीव देशपांडे)**

# महाराष्ट्रातील सुंद आणि उपसुंद

**डॉ. उदय नारकर**

आज महाराष्ट्राच्या राजकारणात सुंद आणि उपसुंद हे वर्णन कुणाला लागू पडत असेल, तर ते भाजप आणि शिवसेनालाच. दोघांनाही वाटते की, भारतीय राजकारणात आपण अमरपट्टाच घेऊन जन्माला आलो आहोत, आणि शिवाय हिंदुत्वाचे अमृत प्यायल्यामुळे जणू सत्तेतील अमरत्व हा आपला जन्मसिद्ध अधिकारच आहे. खरे तर, संसदीय लोकशाहीतील बहुमत मिळवायच्या राजकारणात दोघांनाही हिंदुत्व हा हुकूमाचा पत्ता वाटतो. देशात हिंदू बहुसंख्येने असल्याने त्यांची मते मिळवण्यासाठी फार खटाटोप करावा लागत नाही. देवाधर्माची भाषा बोलणारे पक्ष धर्मभोळ्या हिंदूंची सहज दिशाभूल करू शकतात. त्याच्या आधारावरच हे सुंद आणि उपसुंद महाराष्ट्रात सत्तेवर आले आहेत.

पण त्यांना अमृत पुरवणारा कुंभ खऱ्या अर्थी हिंदुत्वाचा नसून वेगळाच असल्याचे दिसू लागले आहे. भाजपचा जन्म हिंदुत्वासाठी झालाच नाही, असे त्या पक्षाच्या संस्थापकापैकी कुणी म्हणू शकतील. अटलबिहारी वाजपेयी आज बोलू शकते तर त्यांनी यावर प्रकाश टाकला असता. किमान विनोबांसारखे मौनव्रत असते तरी खाणाखुणा करून ते काही सांगू शकले असते. हा पक्ष जन्माला घालणाऱ्या रा. स्व. संघाच्या मोहन भागवतांना विचारण्यात अर्थ नाही. संघात 'ध' चा 'मा' करण्याचे धडे गिरवतच स्वयंसेवक लहानाचे मोठे होत असतात. त्यात जो जास्त प्रविण होतो त्याला सरसंघचालक करतात. त्यामुळे भाजपचा जन्म होत असताना गांधीवादी समाजवादाचे उद्दिष्ट पहाता पहाता मागे पडून त्याची जागा कट्टर हिंदुत्वाने कशी घेतली, यामागील रहस्य भागवत काही सांगण्याची शक्यता नाही.

खरे तर त्यात रहस्य वगैरे काही नाही. कडवा मुस्लीम द्वेष हा संघाचा मूळ पाया. त्यात ख्रिश्चन द्वेषाचे काही दगड, संघाच्या रामभक्तीहून ज्यांची रामभक्ती जास्त अस्सल होती त्या महात्मा गांधींच्या मारेकऱ्याचे, नराधम नथुरामाचे, गोडवे ही मंडळी गातात, त्याच द्वेषबुद्धीपोटी. गांधीवाद जिवंत ठेवण्यासाठीच नथुरामाने गांधीजींचा खून केला, असे कोडगेपणाने सांगायला ही मंडळी मागेपुढे पहाणार नाहीत. उद्या समाजवादी विचार जिवंत ठेवण्यासाठीच कॉ. पानसरेंसारख्या कम्युनिस्टाला ठार करण्यात आले, असेही म्हणतील. अशा अफवा




पसरवण्यासाठी सोशल मिडियावर धुमाकूळ घालणारी तैनाती फौज त्यांनी ठेवली आहेच. पण 'गांधीवाद' आणि 'समाजवाद' हे भाजपने घेतलेले बुरखे आहेत, हे जनतेने ओळखल्याने त्यांनी ते बुरखे फेकून दिले आणि त्यांचे मूळ भेसूर चेहरे उघडे पडले. दोघांचेही चेहरे द्वेषभावनेने कुरुप झालेले. एकाचा मुस्लिम द्वेषाने तर दुसऱ्याचा परभाषिकांविषयीच्या द्वेषाने.

तर या सुंद आणि उपसुंदांच्यात मारामारी सुरू झाली आहे, मुंबई महापालिकेतील अमृतकुंभावरून. दिल्ली देशाची राजधानी. पण देशाच्या कुबेराचे स्थान मात्र मुंबबईत. हा अमृतकुंभ आपल्या ताब्यात यावा यासाठी शिवसेनेचे संस्थापक बाळ ठाकरे यांनी देशातले खरे कुबेर असलेल्या टाटा, बिर्ला, मफतलाल, अंबानी यांच्याशी घनिष्ट संबंध जोडले. या अमराठी भांडवलदारांच्या संपत्तीत अमर्याद भर पडावी म्हणून आपले सारे राजकीय कौशल्य पणाला लावून मराठी कामगाराला देशोधडीला लावले. मुंबईच्या नावाने गळे काढायचे आणि त्याच मुंबईतून मराठी माणूस उठवायचा, अशा कारवायात आयुष्य घालवले.

तोच वारसा त्यांचे चिरंजीव आणि नातू चालवत आहेत. त्यांच्या राजवटीत मराठी माणूस आपल्या रहात्या घरातून परागंदा झाला, आणि व्यंगचित्रकारांचा बघता बघता कुबेर झाला. व्यंगचित्रे काढण्यात इतका वरकड पैसा मिळत असता, तर श्रीनिवास प्रभुदेसाईंना दुसऱ्याच्या साप्ताहिकात कशाला रतीब घालावा लागला असता? 'पंच'सारख्या जगद्विख्यात व्यंगचित्रांना वाहिलेल्या ब्रिटीश नियतकालिकाचे दिवाळे निघाले, हे आपण पाहिलेले आहेच. थोडक्यात, व्यंगचित्रे काढून अब्जाधीश होता येत नाही, अजून.

''हिंदुत्वाच्या नाळेने बांधलेल्या भाजप आणि शिवसेना या नैसर्गिक बंधूंची नाळ कोणीही तोडू शकत नाही,'' अशा राणा भीमदेवी गर्जना हे दोन्ही पक्ष सतत करत आले. पण ही नाळ मागच्या विधानसभा निवडणुकीत तुटली, इतकी तकलादू निघाली. भांडवली पक्षांच्या राजकारणातील नाळ पैसा आणि पैसा हीच असते. तिच्यापुढे रक्तामांसाची नाळही कमजोर ठरते, हे उद्धव-राज, पंकजा-

धनंजय या भावंडांनी दाखवून दिले आहे. त्यामुळे एकपेशीय अमीबाचे विभाजन कधी झाले, हे कळतही नाही. अर्थातच, त्यांच्यात पुन्हा एक होण्याची नैसर्गिक ओढ असतेच. असो बापडी. या प्रक्रियेत 'माझ्या तमाम हिंदूंचे', 'माझ्या तमाम मराठी बांधवांचे' काय होते, हे लक्षात कोण घेतो ? वर हिंदु हृदयाच्या, मराठी हृदयाच्या सिंहासनावर बसायचे आणि खाली अनुयायांना चिरडायचे' असा 'शिवउद्योग' केल्यानेच माणसे पहाता पहाता अब्जाधीश होतात. होऊ द्यात बापडी.

पैसा हा कॅन्सर असतो. अगणित प्रमाणात वाढत रहाणे हा कॅन्सरच्या पेशींचा स्थायीभाव असतो. मुंबईची संपत्ती भांडवलदारांच्या ताब्यात जाणार की तिचा वापर कष्टकऱ्यांच्या प्राथमिक गरजा भागवण्यासाठी, त्यांच्यातील माणूसपणाचे संगोपन करण्यासाठी होणार या पर्यायातून संयुक्त महाराष्ट्राचे महामंथन झाले. १०६ हुतात्म्यांनी आपले रक्त शिंपून मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राचा रथ ओढून आणला. भौगोलिकदृष्ट्या मुंबई महाराष्ट्रात राहिली. पण संपत्ती राहिली भांडवदारांच्याच ताब्यात. यशवंतराव चव्हाण, वसंतराव नाईक आणि वसंतदादा पाटील हे काँग्रेसचे मुख्यमंत्री असोत की मनोहर जोशी आणि देवेंद्र फडणवीस हे सेना-भाजपचे, त्यांच्या सरकारांनी भांडवलदारांच्या घरात पाणी भरण्यातच धन्यता मानली. लोणी नेमके कुठे मुरते ? हे ओळखणारे महाधूर्त राजकारणी म्हणजे दिवंगत नेते बाळ ठाकरे आणि प्रमोद महाजन. त्यांनी भाजप-सेना युती घडवून सत्ता आणि संपत्तीवर मक्तेदारी स्थापन करायचा प्रयत्न यशस्वी केला. राजाचा जीव जसा पोपटात तसा महाराष्ट्राच्या सत्तेचा जीव मुंबईत, हे ओळखून त्यांनी मुंबई ताब्यात ठेवायचा प्रयत्न केला. १९९७ साली हे सुंद आणि उपसुंद बंधू एकमेकांच्या गळ्यात गळे घालून मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत एकत्र आले. तेव्हापासून त्यांची या कुबेरनगरीवर सत्ता आहे. तथाकथित हिंदुत्व हा त्यांना जोडणारा डिंक आहेच. मग शेवटी माशी कुठे शिंकली ?

सुंद आणि उपसुंद राज्यात आणि केंद्रात दोन्हीकडे भागीदार. पण मोठा कोण याविषयी वाद. 'थोरल्या भावाला चार पोरं आणि धाकट्या भावाला दहा, म्हणून काही धाकट्याचा थोरला होत नाही', असा युक्तिवाद सेनेच्या एका खासदाराने केला आहे. राज्य सरकारात दुय्यम भागीदार होताना त्यांचा हा थोरलेपणा कुठे गेला होता, असे त्यांना कुणी विचारील. ते काही असो. हा वैरभाव आजचा नाही. २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत भाजपला जागा मिळाल्या १२२ आणि सेनेला ६३. लोकशाहीच्या करामतीने थोरल्याचा एकदम धाकटा झाला. मुंबईत भाजपने सेनेवर कडी केली जाते. मुंबईतील ३६ विधानसभेच्या जागांपैकी भाजपला मिळाल्या १५ तर सेनेला १४. मुलांच्या खेळात 'तुझ्यावर माझा एक' म्हणत कडी केली जाते, तशी अवस्था या युतीबांधवांची झाली. कमी वाटणीतले शल्य जाता जात नाही. २०१२ च्या निवडणुकीत मुंबई महापालिकेतील २२७ जागांपैकी सेनेने जिंकल्या होत्या ७५ आणि भाजपने केवळ ३२. यावेळी भाजपने ११४ जागा मागितल्या, त्या सेनेला मान्य नव्हत्या. भाजपला जागा सोडणे याचा अर्थ उद्धव ठाकरेंची नेता म्हणून खालवणारी विश्वासार्हता आणखी खालावणे. सुंद आणि उपसुंदांना आता एकत्र रहाणे अशक्य झाले.

शत्रूही परस्परांना देणार नाहीत, इतकी दूषणे हे दोन्ही पक्ष एकमेकांना देऊ लागली आहेत, शिवसेना सत्तेत असून विरोधी पक्ष असल्यासारखा वागत आहे. आपले काम दुसरा पक्ष करतो आहे, हे काँग्रेससारख्या सरंजामी वृत्तीच्या पक्षाच्या आळशीपणाला शोभणारेच आहे. शरद पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस कधी तिलोत्तमा बनून कधी सुंदाला तर कधी उपसुंदाला भुरळ घालील, याचा नेम नाही. सध्या तरी तिलोत्तमा आहे मुंबापुरीची महानगरपालिका. चाळीस हजार कोटी रुपये अंदाजपत्रक असलेली सोन्याची कोंबडी. तिची अंडी सेनेने विकून खाल्ली, असा आरोप भाजप करत आहेच. ती कोंबडी आपल्या ताब्यात यावी, यासाठी चालला आहे, भाजपचा आटापिटा. म्हणून दोघांच्यात लढाई जुंपली आहे. सुंद आणि उपसुंद या बंधूना एकमेकांशिवाय दुसरा कोणीही ठार करू शकणार नाही, असा वर मिळाला होता. कुणाच्याही डोक्यावर हात ठेवून त्या व्यक्तीचे भस्म करायची शक्ती त्यांना प्राप्त झाली होती. अमरत्वाच्या अहंकाराने दोघेही शिरजोर झाले. शिवटी तिलोत्तमा या अप्सरेने त्यांना आपल्या सौंदर्याने भुलवून एकमेकांच्या डोक्यावर हात ठेवायला लावून त्या दोघांचेच भस्म करून टाकले. मुंबई आणि गुजरातच्या दंगलीत आपल्याजवळ जनतेला भस्म करायची शक्ती असल्याचा साक्षात्कार या दोन पक्षांना झालेला आहेच, शिवाय हिंदुत्वाचे अमृत प्राशन केलेले असल्याने आपल्याला मरण नाही, असाही त्यांचा ग्रह झालेला आहे.

जनतारूपी तिलोत्तमा अवतरल्यामुळे यापूर्वीच्या सुंद आणि उपसुंदांना - स. का. पाटील आणि मोरारजी देसाईंना - माती खावी लागली. जनतेला आपल्या सामर्थ्याची जाणीव झाली तर इतिहासाची पुनरावृत्ती अशक्य नाही. तोपर्यंत सेना-भाजपची सुंदोपसुंदी चालूच राहील, कुठल्याशा कारणाने शिवसेनेचे एक शिष्टमंडळ परवा मुख्यमंत्र्यांना भेटायला गेले होते. बाहेर आल्यावर एक नेता म्हणाला, 'आमच्या खिशात आमचे मंत्रिमंडळाचे राजिनामे आहेत.' अशा वेळी हटकून आचार्य अत्र्यांची आठवण येते. जिवंतपणीच आख्यायिका बनलेल्या या हजरजबाबी माणसाच्या नावावर 'तुमच्या मनात आहे, ते माझ्या हातात नाही' ही उक्ती लागली आहे. शिवसेनेच्या नेत्यांना त्याच सुरात विचारायला हवे, ''तुमच्या खिशात आहे. ते तुमच्या मनात आहे का ?''

★ ★ ★


# मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या मुखपत्रांची वार्षिक वर्गणी

## जीवनमार्ग - रु. ४००, लोकलहर - रु. २५०

## पीपल्स डेमॉक्रसी - रु. ३५०, मार्क्सिस्ट - रु. १००

*आपल्या संपूर्ण पत्त्यासहित मनी ऑर्डर/बँक ड्राफ्टने वर्गणी पाठविण्याचे पत्ते*

व्यवस्थापक, जीवनमार्ग, जनशक्ती, पांडुरंग बुधकर मार्ग, वरळी, मुंबई - ४०००१३

(चेक/ड्राफ्ट फक्त 'जीवनमार्ग' या नावे पाठवावा)

इतर मुखपत्रे : मॅनेजर, लोकलहर/पीपल्स डेमॉक्रसी/मार्क्सिस्ट, १५ तालकटोरा मार्ग, नवी दिल्ली - ११०००१

# अति - भांडवलशाही आणि भारत

प्रभात पटनाईक

भारताचा स्वातंत्र्यलढा केवळ परकीय सत्तेपासून मुक्ती मिळवण्यापुरता मर्यादित नव्हता. खरे तर, तो तसा मर्यादित असता तर यशस्वी झालाच नसता. जनतेला स्वातंत्र्य मिळवून देत असतानाच तो एक नवा देशही जन्माला घालत होता. आधुनिक जगाच्या इतिहासात अशा प्रकारचा देश अजून जन्माला आलेला नव्हता. इतिहासात राष्ट्रे आधी निर्माण झाली होती युरोपात. त्या राष्ट्रांची निर्मिती साम्राज्यवादाशी जोडलेली होती. म्हणजे त्या 'राष्ट्रांची निर्मिती आणि त्यांचा साम्राज्यात विस्तार' या एकाच नाण्याच्या दोन बाजू होत्या. या उलट वसाहतीतील स्वातंत्र्य लढ्यांना आपले साम्राज्य निर्माण करायचे नव्हते. खरे तर, त्यांना साम्राज्यातून मुक्तताच हवी होती. या मुक्तीचा आणखी एक महत्वाचा आशय होता. आजवर भारत जातीय विषमतेवर आधारलेला समाज होता. त्याजागी समान नागरिकांच्या भ्रातृभावावर आधारीत नवा समाज या लढ्याला अभिप्रेत होता. ही सामाजिक क्रांती भारतीय मुक्तीलढ्याला अभिप्रेत होती. १९३१ च्या कराची काँग्रेसच्या ठरावात हे उद्दिष्ट ग्रथित झाले होते. या ठरावाची लढ्याला जनतेचा व्यापक पाठिंबा मिळवण्यात कळीची भूमिका होती. जनतेच्या या पाठिंब्याच्या जोरावरच १९३६-३७ मध्ये काँग्रेसने प्रांतिक सरकारच्या निवडणुकीत मोठे, यश प्राप्त केले.

आपल्या जनतेसमोर असे उद्दिष्ट ठेवणारा भारत हा काही त्यावेळी एकमेव देश नव्हता. सर्वच वासाहतिक देशांतून असे लढे चालू होते. आणि ते सर्व कमी-अधिक प्रमाणात समान नागरिकत्वाच्या आधारावरील राष्ट्र उभे करण्याच्या खटाटोपात होते. वसाहतींनी तेथील जुने समाज मोडून टाकले, पण त्या जागी समान नागरिकांचा समाज निर्माण केला नव्हता. उलट त्या समाजांचे तुकडे तुकडे करून त्यांच्यात अतीव विषमता निर्माण केली होती.

एकसंघता हरवलेल्या आणि अत्यंत विषम बनलेल्या समाजाचे रुपांतर परस्परांशी भातृभावाने वागणाऱ्या नागरिकांच्या समाजात करायचे, तर 'परंररां'ची जागा 'विवेका'ने घ्यावी लागते. याचे कारण समान अधिकारावरील भ्रातृभाव परंपरेला कधी मान्यच नव्हती. असा समान भ्रातृभाव 'विवेका'तूनच जन्माला येत असतो. त्याचवेळी हा बदल 'निधर्मी', ऐहिक वास्तव जगाला प्राधान्य देतो. त्यात सर्वांना किमान ऐहिक सुविधा देण्याचा आग्रह असतो. धर्माला ओलांडून व्यक्तीच्या सुप्त क्षमता जागृत करण्याची हमी असते. आता 'संस्कृती' उच्चभ्रूंची मिरासदारी रहात नाही. आधीच्या समाजात संस्कृती नेहमीच धर्माशी निगडीत राहिलेली होती आणि ती नेहमीच विषमतेच्या धाग्यांनी घट्ट शिवलेली असे. आता निधर्मी जगात धर्माच्या वर जाऊन व्यक्तींचा परस्परांशी बंधुभाव जपण्याचा पाया उपलब्ध होऊ लागतो एका सामुदायिक लढ्यातून. सुरवातीला वसाहतवादाविरुद्धच्या आणि नंतर एक चांगला समाज निर्माण करायच्या ऊर्मीतून. एक चांगले आयुष्य देणारा समाज - जे परजन्मात नव्हे तर याच जन्मात जगायला मिळेल, ही भावना व्यक्त करतो.

याला म्हणतात राष्ट्र उभारणी. हे राष्ट्र काही किमान समानतेची आणि ऐहिक जीवनमानाची गरजपूर्ती करतेच, परंतु धर्माच्या स्तराच्या वर असलेल्या चांगल्या जीवनात ज्याला-त्याला वा जिला-तिला आपल्या निवडीनुसार धर्म पाळायची मुभादेखील देते. फक्त हे धर्मपालन समान नागरिकत्वाच्या आधारावरील बंधुभावाच्या आड येणार नाही, याची खातरजमा असावी लागते.

अतिभांडवलशाहीच्या वावटळीत जुने जग विस्कटून वेगाने एकत्र आणले जात आहे. त्यालाच आपण जागतिकीकरण म्हणतो. राष्ट्रवादाने माणसासाठी जे जे कमावले ते ते सारे जागतिकीकरण उधळून लावते. मुद्दा वसाहतींच्या विरोधात लढून निर्माण झालेले राष्ट्र मोडण्याचाच केवळ नाही. तो तर आहेच. पण मानवजातीच्या दृष्टीने त्याचे होणारे परिणाम भयावह आहेत, हादेखील आहे.

भारतात अभूतपूर्व गतीने वाढत चाललेल्या विषमतेचे नव्याने वर्णन करायची गरज नाही. 'ऑक्सफॅम' नावाची एक संस्था आहे. त्यांनी नुकत्याच सादर केलेल्या आकडेवारीनुसार भारतात सर्वात वरच्या १ टक्का लोकांच्या हातात देशातील ५८ टक्के संपत्ती एकवटलेली आहे. आणि सगळ्यात वरच्या १० टक्के लोकांच्या हातात देशातील एकूण संपत्तीपैकी ८०.७१ टक्के संपत्ती एकवटलेली आहे. याच्या उलट सगळ्यात तळच्या १० टक्के लोकांच्या हातात देशातील संपत्तीच्या-०.६८ टक्केच संपत्ती आहे. याचा अर्थ त्यांच्या मालमत्तेपेक्षा त्यांच्या डोक्यावरील कर्जाचा बोजाच जास्त आहे. ही विषमता जगाच्या तुलनेत कितीतरी मोठी आहे, अतिभांडवलशाहीच्या हल्ल्यात ती अतिशय वेगाने वाढत आहे. विशेषत: नवे आर्थिक धोरण राबवायला सुरुवात झाल्यापासून.

'आक्सफॅम'च्या आकड्यांविषयी कोणी शंका घेऊ शकेल. पण ती इतर संस्थांच्या आकड्यांशी जुळणारी असल्याने तसल्या कुशंकांना काही अर्थ नाही. 'क्रेडिट स्वीस' या बँकेने दोन वर्षापूर्वी प्रसृत केलेल्या आकडेवारीनुसार भारतातील वरच्या १ टक्का कुटुंबांच्या हातात देशाची जवळजवळ अर्धी संपत्ती आहे. इतकेच नव्हे तर या १ टक्क्यांच्या हातातील संपत्ती एकविसावे शतक सुरू झाल्यापासून जास्तच वाढत राहिली आहे. अशा रीतीने संपत्तीचे भयानक केंद्रीकरण, अमेरिकेहूनही जास्त अशी भयाण विषमता ही भारताची आर्थिक परिस्थिती राहिली आहे. 'ऑक्सफॅम' आणि 'क्रेडिट स्वीस' या दोन्ही संस्थांचे निष्कर्ष समानच आहेत. भारतात नाव घेण्याजोगा संपत्तीवरील कर नाही आणि भांडवलावरील करदेखील जवळजवळ काढून घेतल्यासारखाच असल्याने विषमतेची रुंदावणारी दरी कमी होण्याची चिन्हे बिलकुल नाहीत.

'ऑक्सफॅम'ची पुढची आकडेवारी पहा. १९८८ ते २०११च्या दरम्यान सर्वात वरच्या १० टक्के लोकांचे दरडोई उत्पन्न सर्वात खालच्या १० टक्क्यांच्या २० पट वाढले. विषमतेची खाई अशी वाढत असताना देश स्वातंत्र्याच्या पूर्वसंध्येला समान नागरिकत्वाचे पाहिलेले स्वप्न प्रत्यक्षात उतरण्याकडे आपली वाटचाल चालू आहे, हा दावा हास्यास्पद ठरतो. लोकशाहीच्या जतनासाठी किमान आर्थिक समानतेची गरज आहे, ही गोष्ट थॉमस पिकेटी आणि अॅन्टनी अॅटकिन्सन या विचारवंतांनी अधोरेखित केली आहे. हे दोघेही कम्युनिस्ट विचाराचे नाहीत. पण त्यांचे म्हणणे बरोबर आहे.

विषमता वाढत आहेच, तीही अतिशय वाढत्या दराने. पण बहुसंख्य जनतेसाठी किमान जीवनमानही आवाक्याबाहेर गेले आहे, आणि ते आवाक्यात येण्याची शक्यताही दूर दूरच जाऊ लागली आहे. अतिभांडवलशाहीच्या या

कालखंडात बहुसंख्य लोकांच्या पोषणाचा स्तर खालावला आहे. सरकारच्या मते दारिद्र्यरेषा ठरवण्यासाठी दरडोई २२०० कॅलरी देणारे अन्न मिळाले पाहिजे. ग्रामीण जनतेत २२०० हून कमी कॅलरी मिळणाऱ्यांचे प्रमाण १९९३-९४ साली ५८ टक्के होते. २०११-१२ साली ते ६८ टक्के झाले. शहरी भागासाठी दारिद्र्यरेषा ठरवण्यासाठी २१०० कॅलरी आधार धरला आहे. यानुसार तेथील दारिद्र्याचे प्रमाण १९९३-९४ साली एकूण लोकसंख्येच्या ५७ टक्के आणि २०११-१२साली ६५ टक्के झाले. म्हणजे भारताच्या अर्थव्यवस्थेचा दर वाढला तरी विषमता वाढतच राहिली.

अतिभांडवली कालखंडाचा आणखी एक घातक परिणाम झाला आहे. वसाहतवाद विरोधी संघर्षात अंगिकारलेला राष्ट्रबांधणीचा प्रकल्प पूर्ण करायचा झाल्यास काही भौतिक अटी पूर्ण करणे आवश्यक आहे. त्या भौतिक पूर्वअटी तर पूर्ण केल्या जातच नाहीत, उलट 'विवेका'वर आधारीत विचार नष्ट केला जात आहे.

याची कारणे अनेक आहेत. एक तर या अतिभांडवली धोरणामुळे कामगार चळवळ कमजोर झाली आहे. आधीच पारंपारिक उद्योग व्यवसायांवर बड्या भांडवलाच्या आक्रमणाने गंडांतर येऊन त्यातील कामगार, उद्योजक धंद्याबाहेर फेकला जातो. त्याचबरोबर अतिभांडवलावर आधारीत विकासात रोजगार इतका कमी निर्माण होतो की, नैसर्गिक रित्या भर पडणारे कामगारही त्यात शोषून घेतले जाऊ शकत नाहीत. नवीन रोजगार निर्माण करायची बातच सोडा. पारंपारिक धंद्यातून विस्थापित झालेले लोक या व्यवस्थेत कामगार म्हणून सामावून घेतले जात नाहीत. याच्या परिणामी 'बेकारांच्या फौजेत' मोठी भरती होत रहाते आणि कामगारांची आक्रमक हल्ले करायची शक्ती क्षीण होते.

कामगारांची संघटीत शक्ती क्षीण करण्यामागे काही प्रक्रिया चालू करण्यात आल्या आहेत. सार्वजनिक क्षेत्रातील उद्योग खासगी केले जात आहेत. सार्वजनिक क्षेत्रातील काम खासगी क्षेत्राला आऊटसोर्स केले जात आहे. कायम कामगार कमी करून त्या जागी हळू हळू हंगामी कामगार भरले जात आहेत. हे हंगामी कामगार म्हणजे बेकारांच्या राखीव फौजेतील शिपाईच होत. या साऱ्यांच्या परिणामी ट्रेड युनियन चळवळ विकलांग झाली आहे.

दुसरे म्हणजे, अति भांडवलशाहीत देशाची अर्थव्यवस्था जागतिक बनलेल्या वित्तीय भोवऱ्यात गरगरत रहाते. या परिस्थितीत निवडणुकांचे निकाल काहीही लागोत, त्यांचा सरकारच्या आर्थिक धोरणांवर काडीमात्र परिणाम होत नाही. सरकार वित्तीय भांडवलाला हात लावत नाही. त्यामागे ते भांडवल देशातून पळून जाईल, ही भीती असते. या भोवऱ्यातून अर्थव्यवस्था बाहेर काढल्यास पर्यायासाठी जागा खुली होईल. पण ती खुली होणार नाही, अशी व्यवस्था केली जाते. त्यामागे, अतिभांडवलशाहीला पूरक वैचारिक भूमिका आणि राजकीय इच्छाशक्तीचा अभाव ही कारणे महत्वाची असली तरी अचानक वित्त भांडवल पळून गेल्याने अर्थव्यवस्थेच्या अंगावर होणाऱ्या जखमा त्रासदायक असतात, ही भीतीही आहे.

अशा रीतीने अर्थव्यवस्थेसमोर उपलब्ध होऊ शकणारा पर्यायाचा मार्ग अति भांडवलशाही आधीच बंद करून टाकते. भांडवलावर नियंत्रण लादण्याच्या नुसत्या कल्पनेनेच डावे पक्ष सोडून इतर राजकीय पक्षांच्या अंगावर शहारे येतात. यातूनच एकूण प्रागतिक विचारसरणी अति भांडवलशाहीच्या वैचारिक दादागिरीपुढे मान तुकवू लागले आणि डाव्यांची परिणामकारकता आणखी कमी होते.

अशा रीतीने अति भांडवलशाहीच्या युगात जनतेच्या भौतिक परिस्थितीत सुधारणा करण्याचे, जनतेचे आपले जीवनमान सुधारण्याचे लढे पाठीमागे पडू लागतात. काही विशिष्ट समाजघटकांचे आपल्या जीवनमानाशी निगडीत लढे होत रहातात. हे खरे. उदाहरणार्थ, एखाद्या विशिष्ट ठिकाणी एखादा कारखाना, प्रकल्प व्हावा की न व्हावा, विशिष्ट समाजघटकांच्या जीवनात तो सुधारणा आणेल की नाही ? यावर लढे होतात. अस्मितांच्या प्रेरणेने असे लढे होत रहातात. पण त्यांचे एकूणच जनतेच्या सर्वांगीण जीवनमानात सुधारणा करण्याच्या सर्वंकष लढ्यात रूपांतर होत नाही.

यातून लढ्यांची एक नवीच चौकट समोर येते. आता 'सांस्कृतिक' लढायांना महत्व येऊ लागले. 'परंपरांचे' संरक्षण करायचा मुद्दा जीवनमरणाचा बनू लागतो. 'आमची जीवनशैली जोपासण्याला' प्राधान्य दिले जाते. हे सर्व मुद्दे आणि लढे पुरोगामी चळवळीला बाधा पोचवणारेच ठरतात. 'आमची जीवनशैली' बहुसंख्याक समुदायाच्या संदर्भचौकटीत ठरते. विशेषत: बहुसंख्याक समाजातील प्रभावी जातीच्या, देशाच्या, वसाहतवादविरोधी लढ्याने जनतेसमोर ठेवलेला सर्वसमावेशक कार्यक्रम बाजूला पडून त्याची जागा बहुसंख्याक समाजाची पारंपारिकता घेते; लहान लहान समाजगट मुख्य प्रवाहातून बाजूला फेकले जातात आणि जनतेची एकजूट चिरफाळते.

पुन्हा पुन्हा 'परंपरा'चा घोष करत रहाणे हे विवेकाला तिलांजली या अर्थाने एक प्रतिगामी पाऊल आहे. त्यातून एक प्रकारचा अविवेक प्रसृत होऊ लागतो; केवळ उजव्या राजकीय झुंडशाहीच्या रुपातच नव्हे तर एकूण जनमानसही त्यासोबत वहात जाऊ लागते. आधुनिक जगाने फसवल्याची भावना होऊन लोक परंपरेची, अ-विवेकाची पळवाट शोधू लागतात. देशाच्या राजकारणात आज दिसते तसे. मोदींच्या भाषणात विचारांचा पोकळपणा असला तरी नाटकी आवेश असतो. लोक अ-विवेकालाच टाळ्या वाजवू लागतात. त्यात विचाराच्या आदान-प्रदानाला वावच उरत नाही. आणि स्थानिक स्तरावरही तेच दिसते. तामीळनाडू एके काळी विवेकवादाच्या चळवळीत देशात अग्रेसर होता. त्याचा तामीळनाडूत 'तामीळ संस्कृती'च्या नावाने परंपरावाद कसा डोके वर काढत आहे, हे आपल्याला 'जल्लिकट्टू'च्या निमित्ताने दिसले आहे.

हे वळण धोकादायक आहे. घड्याळाचे काटे मागे फिरत नसतात आणि बहुसंख्याक परंपरावादाच्या चौकटीबाहेर फेकलेल्या घटकांनी निमूटपणे परत त्या चौकटीत जाऊन बसावे, हे शक्य नाही. पण त्याचबरोबर वसाहतवादविरोधी लढ्यातून सिद्ध झालेला राष्ट्रवादाचा प्रकल्प गुंडाळून टाकणे हेही अत्यंत धोकादायक आहे. त्यातून अंतर्गत संघर्ष उफाळून देशाचे तुकडे पडतील. अति भांडवलशाही आपल्या सोबत घेऊन येते हा नवा धोका. पण अति भांडवलशाही हा भांडवलशाहीचाच टप्पा असल्याने आपल्या देशाचा 'राष्ट्रवाद' भांडवली चौकटीत परिपूर्णरित्या फुलणे अशक्य आहे, हे अधोरेखित करायला हवे.

हा मुद्दा डाव्यांनी सतत मांडला आहेच. वसाहतवादविरोधी लढ्यातील इतर घटकांच्याही तो ध्यानात आला आहे. परंतु, दोन्हीत एक फरक आहे, समाजवादी लोकशाही विचारधारेच्या मते भांडवलशाहीला वेसण घालून तिच्याकडून जनहिताची कामे करवून घेता येतील. इतिहासाने हा समज खोटा ठरवला आहे. त्यामुळे भारतासारख्या देशात डाव्यांसमोर विशेष आव्हान आहे. सर्वसमावेशक अशा राष्ट्रबांधणीच्या प्रकल्पात खो घालणाऱ्या भांडवलशाहीला कसे नामोहरम करत जायचे, हेच ते आव्हान आहे.


**(अनुवाद : डॉ. उदय नारकर)**

# ऑक्टोबर क्रांती आणि विज्ञान

**प्रबीर पुरकायस्थ**

ऑक्टोबर क्रांतीने दोन प्रकारे विज्ञानाचे जग बदलले. त्यातील पहिला भाग म्हणजे - विज्ञान आणि तंत्रज्ञानाचे नियोजन करता येते. विज्ञान, तंत्रज्ञान आणि उद्योगधंदे यांच्या नियोजनातून रशियासारखा मागास सरंजामी देश आपल्या समाजरचनेचे समायोजन करून केवळ काही दशकांतच पाश्चात्य देशातील विकसित देशांना गाठू शकला. विसाव्या शतकातील तिसऱ्या आणि चौथ्या दशकात केलेल्या जलद औद्योगिकीकरणामुळेच रशिया दुसऱ्या महायुद्धात नाझी जर्मनीचा मुकाबला करू शकला. दुसरे असे की, ऑक्टोबर क्रांतीमुळे विज्ञान, तंत्रज्ञान आणि समाजाकडे (STS) पहाण्याचा दृष्टीकोनच बदलला गेला. इतका की, त्यामुळे विज्ञान-तंत्रज्ञान-समाजभ्यास ही एक नवी ज्ञानशाखा उदयास आली. अर्थात याचा अर्थ असा नव्हे की, या ज्ञानशाखेचा अभ्यास करणारे मार्क्सवाद आणि ऑक्टोबर क्रांतीचे ऋण मान्य करतात. पण नाखुशीने का होईना, ब्रिटीश मार्क्सिस्ट आणि वैज्ञानिक बर्नाल हा या ज्ञानशाखेचा उद्गाता होता. हे त्यांना मान्य करावेच लागते.

सोव्हिएत युनियन पाश्चात्य देशांशी म्हणजे, युनायटेड स्टेट्स (अमेरिका) आणि वसाहतवादी देश यांच्याशी स्पर्धा करण्यात कसा मागे पडला? याची चर्चा करणारे एक गोष्ट सोयीस्करपणे विसरतात ती म्हणजे पहिले समाजवादी राष्ट्र उदयाला आले ते अत्यंत मागास आणि जवळपास पूर्ण ग्रामीण देशात. ऑक्टोबर क्रांतीनंतर लगेच पाश्चात्य वसाहतवादी देशांशी मुकाबला करताना त्याच वेळी पहिल्या महायुद्धातून सावरून नंतर झपाट्याने औद्योगिकीकरण करावयाचे आव्हान त्यांच्यापुढे उभे ठाकले होते. पाश्चात्य राष्ट्रांनी यापैकी बराच काळ सोव्हिएत युनियनची आर्थिक नाकेबंदी केली होती. सोव्हिएत युनियनच्या नेतृत्वाला आपण अग्रक्रमाने औद्योगिक आणि सैनिकी बळ प्राप्त केले नाही. तर साम्राज्यवादी शक्तींशी आपल्याला मुकाबला करता येणार नाही याची खात्री पटली.



१९१७ साली रशिया किती मागास होता, याची आज कल्पनादेखील करणे कठीण आहे. ऐंशी टक्के रशियन अशिक्षित होते. उच्च शिक्षणाच्या केवळ ९० संस्था होत्या आणि त्यातून १,१२,००० विद्यार्थी फक्त शिकत होते. १९४१ पर्यंत या महाविद्यालयांची संख्या ८००पर्यंत वाढली आणि त्यातून ६,६७,००० विद्यार्थी शिकू लागले. केवळ त्यांची संख्याच नाट्यमयरित्या वाढली असे नव्हे, तर संस्था सोव्हिएत युनियनच्या अवजड उद्योग आणि निर्मिती क्षेत्राशी घट्टपणे गुंफल्या गेल्या होत्या.

नवनिर्मित सोव्हिएत युनियनने विज्ञान-तंत्रज्ञानामध्ये केवळ भरीव गुंतवणुकच केली असे नव्हे, तर त्यांचे नियोजनदेखील सोव्हिएत युनियनच्या विकासनियोजन आराखड्याच्या बृहत संदर्भाशी जोडून केले. विज्ञान-तंत्रज्ञान संस्थांचा संयोग उद्योगधंद्यांशी केल्यानेच दोन्हींचा विकास झपाट्याने घडून आला. सोव्हिएत युनियनचे विद्युतीकरण आणि त्याच्या वैमानिकी उद्योगाची उभारणी ही या संयोगाची निष्पती लहानसहान म्हणता येणार नाही.

सोव्हिएत युनियनच्या औद्योगिक बळाच्या जलद विकासामुळेच, नाझी जर्मनीच्या नेतृत्वाखालील आघाडीचा बीमोड करणे शक्य झाले. पाश्चात्य लेखक आणि मुख्यप्रवाही माध्यमातून जर आपण दुसऱ्या महायुद्धाचा इतिहास वाचायला लागलो तर त्यातून 'सोव्हिएत युनियनने युद्धाचा पेललेला भार हा जवळपास पुसून टाकल्याचे आपल्याला दिसते. आघाडीचे चारपंचमांश सैन्य पूर्वेकडे सोव्हिएत युनियनबरोबर लढत होते; आणि या लढ्यातच नाझी जर्मनीच्या लष्करी ताकदीचा खातमा झाला; हे नमूद करण्याची तसदी ते घेत नाहीत.

युद्धकाळात सोव्हिएत युनियनच्या युद्धउद्योगाने अधिक विकसित जर्मन उद्योगापेक्षा अधिक उत्पादन केले. केवळ शस्त्रास्त्रे आणि उपकरणे निर्मिती नव्हे तर सोव्हिएत युनियनच्या युद्धग्रस्त पश्चिम भागातून पूर्वेकडे उद्योगधंद्यांची आणि विज्ञानसंस्थांची हलवाहलव करणे हे जगड्व्याळ काम देखील त्यांना करावे लागले.

एवढे सगळे, ऑक्टोबर क्रांतीपूर्वी जो देश विजेचे बल्बदेखील करायचा नाही, त्या देशाला कसे करता आले? त्याचे कारण अगदी कोऱ्या पाटीने उद्योगधंदे सुरू करताना त्यात केलेली भांडवल गुंतवणूक एवढेच फक्त नव्हते, तर मुख्यत्वेकरून जनतेमध्ये केलेली गुंतवणूक, हे होते. सोव्हिएत युनियनने शास्त्रज्ञ आणि तंत्रज्ञांच्या तरुण पिढीमध्ये प्रचंड गुंतवणूक केली होती. त्याच्या औद्योगिकीकरण कार्यक्रमाबरोबर ही तरुण पिढी घट्टपणे गुंफली होती. औद्योगिकीकरण हे यंत्रे आणि कारखान्यांशी तर जोडलेले असतेच, पण दुसऱ्या बाजूला लोकांशी आणि त्यांच्या ज्ञान-कौशल्याशी देखील जोडलेले असते. आणि हे सगळे घडवता येते नियोजनाचा उपयोग करून. हा असा एक पैलू आहे की जो, समाजवादी व्यवस्थेला सद्यकालीन भांडवली व्यवस्थेपेक्षा अलग करतोय भांडवली व्यवस्था नियोजनाऐवजी उदो उदो करते ती बाजारपेठेच्या सार्वभौमत्वाचा.

युद्धानंतर काही काळ सोव्हिएत युनियनने पश्चिमेला विज्ञान तंत्र ज्ञानाच्या काही क्षेत्रात मागे टाकले. मनुष्याला सोव्हिएत युनियनने पहिल्यांदा अंतराळात पाठवले. गणित आणि पदार्थविज्ञानात सोव्हिएत युनियन एक महत्वाची नवी शक्ती म्हणून पुढे आले. लेसरसारखे नवे तंत्र, लिनियर प्रोग्रॅमिंगसारखे पुढारलेले नवे संगणकीय तंत्रज्ञान, नॉन-लिनियर

सिस्टीमच्या गुणधर्माचे सखोल ज्ञान पुढे पाश्चात्यांनी केऑस/ फ्रॅक्टल थिअरी म्हणून हे शोधले) आणि इतरही अनेक नवे शोध सोव्हिएत युनियनच्या नावे आहेत.एके ठिकाणी मात्र ते वाट चुकल्याची नोंद आहे –जीवशास्त्रांतर्गत जेनेटिक्स ऐवजी वनस्पतीशास्त्रज्ञ लायसेन्कोचे सिद्धांत स्विकारल्याची. त्याचा अपवाद वगळता सोव्हिएत विज्ञानाने अनेक क्षेत्रात मिळवलेले यश, आज पद्धतशीरपणे पुसून टाकण्याचा घाट घातला गेलेला आहे.

'सोव्हिएत युनियन मागे का पडले ? त्याचे कारण शास्त्र आणि तंत्रज्ञ विज्ञान-तंत्रज्ञान विकसित करण्यात कमी पडले, असे नाही तर ह्या प्रगत शोधांचे उद्योगात रुपांतर करण्यात ते अपयशी ठरले. आज आपल्याला कळते की, अंतराळ आणि युद्धविषयक तंत्रज्ञानातील आघाडीसाठी सोव्हिएत युनियनला मोठी किंमत मोजावी लागली. या क्षेत्रातील काही बाबींमध्ये त्यांनी यश मिळविले हे खरे, पण इतर अनेक क्षेत्रांमध्ये ते मागे पडले. औद्योगिकदृष्ट्या अधिक प्रगत पाश्चात्य राष्ट्रांएवढी साधन-सामुग्री सोव्हिएत युनियनकडे नव्हती. तंत्रज्ञानात सातत्याने बदल घडवण्यासाठी तिची फार मोठी गरज असते.

सोव्हिएत युनियनचाच फक्त विचार न करता आपण म्हणू शकतो की, ऑक्टोबर क्रांतीचा एकूण जगातील विज्ञानक्षेत्रावर झालेला परिणाम जास्त व्यापक आणि सखोल होता. जगाच्या इतिहासात पहिल्यांदा ऑक्टोबर क्रांतीने दाखवून दिले की, विज्ञानाचे नियोजन करता येणे शक्य आहे. पाश्चात्य शास्त्रज्ञांच्या हे गावीदेखील नव्हते. थोर ब्रिटिश मार्क्सवादी आणि चतुरस्त्र विद्वान आपल्या 'विज्ञानाची सामाजिक फलश्रुती' या ग्रंथात म्हणतो की, अगदी छोट्या कालावधीत सोव्हिएत युनियनने जी मुसंडी मारली त्याचे रहस्य त्या राष्ट्राच्या विज्ञान-नियोजनात आहे. त्यांनी आपल्या बजेटचा मोठा हिस्सा संशोधन आणि विकासासाठी राखून ठेवला आणि त्याची सांगड उत्पादन प्रक्रियेशी घातली.

विज्ञान आणि विकासाचे हे प्रारुप भारत आणि इतर नव्याने स्वतंत्र झालेल्या देशांसाठी आदर्शवत ठरले. भारताने नियोजनाचा ढाचाच सोव्हिएत युनियनकडून स्विकारला असे नाही तर आपल्या स्वत:च्या विज्ञानसंस्थांची उभारणी आणि विकास यांच्यातील गुंतवणूकदेखील भारताने नियोजनपूर्णरित्या केली. या काळात होता, बर्नाल हा भारताचा सल्लागार, जेबीएस हाल्डेन दुसरा ब्रिटिश मार्क्सवादी शास्त्रज्ञ देखील भारताचा सल्लागार होता. त्याने भारतात स्थलांतर केले आणि भारताचे नागरिकत्वदेखील पत्करले. वसाहतवादाच्या जोखडातून मुक्त झालेल्या जवळपास प्रत्येक राष्ट्राचे विज्ञान-नियोजन हे महत्वपूर्ण अंग बनले.

१०३१ मध्ये लंडन येथे झालेल्या विज्ञानइतिहासाच्या अधिवेशनात बर्नालचा सहभाग होता.१९३१ पर्यंत मागे गेल्याशिवाय विज्ञान इतिहासावर मार्क्सवादाचा काय प्रभाव पडला? याची कल्पना करणे कठीण आहे. बुरवारिनच्या नेतृत्वाखाली या अधिवेशनात सहभागी झालेल्या तल्लख सोव्हिएत विद्वानांनी आपले विचार लंडनच्या विज्ञान-तंत्रज्ञान इतिहासाच्या दुसऱ्या आंतरराष्ट्रीय परिषदेत मांडले होते. बोरीस हेअनने न्यूटनवर केलेले मूलभूत संशोधन तिथे सादर केले होते. द्वंद्वात्मक भौतिकवादाची पद्धत जी मार्क्सने एकदा विशिष्ट काळ आणि व्यक्तींचे त्याला योगदान यांचे संबध उलगडण्यासाठी विकसित केली, त्याचे न्यूटन प्रणित विज्ञानाचा उद्‌गम आणि विकासाशी नाते जोडून दाखवणारी हेअनची मांडणी अतिशय प्रभावकारी होती. विज्ञानइतिहास हा व्यक्तीच्या अंगाने न मांडता अगदी पहिल्यांदाच सामाजिक अंगाने मांडला जात होता. बर्नाल, नीडहॅम, जेबीएस हाल्डेन, लॅन्सेलॉट हॉगबेन आणि इतर अनेकांच्या दृष्टीने विज्ञानाकडे पहाण्याचा हा नवा दृष्टीकोन अतिशय प्रत्ययकारी होता. यानंतरचा विज्ञान इतिहास पूर्णपणे वेगळ्या वाटने जाणारा होता.

विज्ञानाबद्दलच्या या नव्या दृष्टीकोनाचा प्रभाव ग्रेट ब्रिटनपुरता सीमित राहिला नाही. फ्रान्सच्या जोलियॉट क्युरीप्रमाणेच जगातील इतर राष्ट्रांतील अनेक लोकांना त्याने प्रभावित केले. वर म्हटल्याप्रमाणे तिसऱ्या जगातील राष्ट्रे व युनायटेड नेशनच्या बऱ्याच संस्थांच्या विकासाचे मूळ त्यात आहे.

विज्ञानाचे नियोजन आणि विज्ञानाकडे एक ऐतिहासिक विकासप्रक्रिया म्हणून पाहणे या नवविचारातून विज्ञान-तंत्रज्ञान समाज अभ्यासाची एस-टी-एस स्टडीज ही नवी विद्याशाखा उदयाला आली. या विद्याशाखेचा प्रणेता जे. डी. बर्नाल असला तरी, अनेकांनी तिच्या विकासाला हातभार लावला आहे. जोसेफ नीडहॅम आणि चिनी विज्ञानेतिहासावरचे त्याचे प्रचंड काम, हालेन आणि त्याचे युनेस्कोवरील काम, ए. रहमान आणि इतर अनेकांनी या विद्याशाखेत भरीव कामगिरी केली.

एकोणीसशे तीसच्या दशकातील या मूलवादी शास्त्रज्ञांनी विज्ञानाकडे पहाण्याची दृष्टीच केवळ बदलून टाकली, असे नव्हे तर शास्त्रज्ञांच्या सामाजिक जबाबदारीविषयी त्यांनी प्रश्न उपस्थित केले. विज्ञानामध्ये मानवतेला उपकारक अशा क्षमता असतात हे खरे, पण दोन महायुद्धांनी (पहिल्या महायुद्धातील विषारी वायु आणि दुसऱ्यातील आण्विक अस्त्रे) दाखवून दिल्याप्रमाणे विज्ञानामध्ये अतिसंहारक क्षमता दडली आहे. या महायुद्धांतून दोन चळवळींचा उगम झाला –पहिली, शांतता चळवळ आणि दुसरी शास्त्रज्ञांचे सामाजिक उत्तरदायित्व. या चळवळींनी या युद्धाबद्दल तर प्रश्न उपस्थित केलेच, पण त्याचबरोबरीने बौद्धिक संपदा हक्कांचा (पेटंट्स, कॉपीराइट्स औद्योगिक आराखडे वगैरे) उपयोग करून भांडवल ज्या प्रकारे विज्ञानाला दास बनवते त्याविरोधातदेखील आवाज उठवला. मुक्त संगणकप्रणाली चळवळ आणि आरोग्य चळवळीचा बौद्धिक संपदेबरोबरच्या संघर्षाचा पाया हा 'विज्ञान सर्व मानवतेसाठी असते आणि विज्ञान-तंत्रज्ञान क्षेत्रातील समूहाचा ध्येयवादी संघर्ष ही त्यांची जबाबदारी आहे', या ठाम भूमिकेवर आधारला आहे.

यापुढे शास्त्रज्ञतंत्रज्ञांनी विज्ञानाकडे कसे पहावे, याबद्दल एक ठाम भूमिका ऑक्टोबर क्रांतीमुळे निर्माण झाली आहे. आज प्रत्येक देश आणि जगड्व्याळ औद्योगिक कॉर्पोरेशन्समध्ये देखील विज्ञानाचे नियोजन केले जाते. बर्नालला कालबाह्य समाजवादी म्हणून भले निकालात काढोत, विज्ञान ही सुनियोजित प्रक्रिया असावी आणि शासनाने संशोधन आणि विकास खर्च करायला हवा हा त्याचा आग्रह मात्र भांडवली मंत्राचादेखील भाग बनला आहे. बर्नाल आणि इतर डावे कमी कुठे पडले ? भांडवलाची पुन्हा उसळी घेण्याची क्षमता, त्याचा चिवटपणा आणि विचारांतील नव्या दिशा आत्मसात करण्याची त्याची क्षमता याबद्दलचा पुरेसा अंदाज त्यांना आला नाही.

'ऑक्टोबर क्रांतीचा इतिहास आणि तिचा प्रभाव' या इतिहासाच्या मुख्य प्रवाहातून गाळला जात आहे. बर्नाल शिल्लक आहे, पण अडगळीत. हेसन आणि विज्ञानेतिहासावरील त्याचा प्रचंड प्रभाव हा विरून गेला आहे. दुसऱ्या महायुद्धाचा इतिहास हा हॉलिवुडने सांगायची आणि विकीपिडीयाने लिहायाची प्रथा पडली आहे. आता आपणच ऑक्टोबर क्रांतीच्या महान योगदानाला जागते ठेवायला हवे.

इतिहास विरून टाकता येतो, खोडता येत नाही. वर्तमानदेखील तो जिवंत विचार म्हणून वावरत असोतच. त्यातून आपल्याला विज्ञान आणि मानवजातीसाठी त्यात दडलेल्या उपकारक क्षमता यांचे ज्ञान होते. ऑक्टोबर क्रांतीची यश:सिद्धी आणि आपल्या लढ्यांवरील तिचा प्रभाव तो दर्शवतो. विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा बहुजनहिताय उपयोग कसा करावा ? मूठभर लोकांसाठी संपदा निर्माण करताना पर्यावरण आणि संस्कृतीचा विनाश करण्याऐवजी विज्ञान हे जनसेवेसाठी कसे वापरावे ? ऑक्टोबर क्रांतीचे स्मरण करताना ही आपल्यापुढील आव्हाने आहेत. **(अनुवाद : डॉ. शरद नावरे)**

# महा-जना पदयात्रा : सामाजिक न्यायासह विकास

**बी. वेंकट**





मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या तेलंगणा राज्य कमिटीने राज्याचा 'सामाजिक न्यायासह सर्वसमावेशक विकास' या संकल्पनेचा प्रचार आणि त्यास जनतेचा पाठिंबा मिळविणे हे लक्ष्य ठेवीत राज्यभर महा-जना पदयात्रेचे आयोजन केले होते. त्या वेळेस राज्य कमिटीने पर्यायी विकासावर आपला दृष्टीकोन मांडणारा व त्यात भर टाकण्याचे जनतेला आवाहन करणारा दस्तऐवज प्रसिद्ध केला. ह्या दस्तऐवजामध्ये घटनात्मक तरतुदींच्या चौकटीत जे विकासाचे पर्याय उपलब्ध आहेत त्यावर प्रकाशझोत टाकलेला आहे. आजपर्यंत येथील सत्ताधारी वर्गाने या पर्यायांकडे दुर्लक्षच केलेले आहे. केवळ सरकारी धोरणांवर टीका न करता जनतेच्या हिताच्या ठरणाऱ्या पर्यायी विकासाच्या योजना मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने विधायक विरोधकाच्या नात्याने जनतेपुढे आणलेल्या आहेत. पर्यायी विकासाचा दृष्टीकोन मांडणारा हा दस्तऐवजही ह्याच परंपरेचा भाग आहे.

पण मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने जे प्रश्न उपस्थित केले आहेत त्याचा विचार करण्याऐवजी तेलंगणाचे टीआरएस सरकार त्याचा उपहासच करत आहे. अर्थात अशा टीकेला भीक न घालता विकासाच्या प्रश्नावर राज्याने स्विकारलेले प्रतिमान घेऊन सरकारने आमने-सामने यावे असे आव्हान मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने दिले आहे.

१७ ऑक्टोबरला ॲड.प्रकाश आंबेडकरांच्या जाहीर सभेने महा-जना पदयात्रेचा प्रारंभ झाला. १६ डिसेंबरला या यात्रेने ६० दिवस पूर्ण केले आहेत. या दोन महिन्यात यात्रेने २००० किमीचा प्रवास केला आहे व ६००पेक्षा जास्त खेड्यांना भेटी दिल्या आहेत. या भेटीत सर्वसामान्य जनतेच्या दैनंदिन प्रश्नांसंबंधातील ६००० तक्रारी, सूचना आल्या आहेत.

तेलंगणा अविभाजित आंध्र प्रदेशात सामाजिक, राजकीय आणि आर्थिकदृष्टया दुर्लक्षित विभागच होता. या दुर्लक्षामुळे आर्थिक विकासाच्या फायद्यांपासून हा विभाग आणि वर्ग वंचित राहीला. साहजिकच या दुर्लक्षावर झोत टाकणाऱ्या घोषणा लोकांच्या भावनांना साद घालत होत्या व लोक त्या पाठी उभे राहिले आणि उत्तेजित जनतेने ऐतिहासिक आंदोलन केले. त्याचा परिणाम तेलंगणा हे वेगळे राज्य होण्यात झाला. पण हा लक्षापर्यंत पोहोचण्याचा अर्धा टप्पाच झाला. त्याचा पुढचा टप्पा आहे सामाजिक न्यायाचा जो अजूनही प्रत्यक्षात यावयाचा आहे, ज्यासाठी ही ऐतिहासिक पदयात्रा मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या राज्य कमिटीने संघटीत केलेली आहे.

स्वतंत्र राज्याच्या संघर्षातील विजेत्याच्या थाटात टीआरएसने २०१४च्या विधानसभा निवडणूका भावनेच्या लाटेवर स्वार होत जिंकल्या. या निवडणूकीत अनेक भरमसाठ आश्वासने देत टीआरएसने जनतेच्या अपेक्षा आकाशाला भिडवल्या. पण सत्ता हातात आल्याबरोबर टीआरएस सरकारने धोरणांच्या बाबतीत आपल्यात आणि आपल्या पूर्वसुरींच्यात काहीही फरक नाही हे सिध्द केले. अर्थात ज्या जागतिकीकरण आणि उदारीकरणाच्या धोरणांमुळे जनतेतील विविध विभागांत तसेच प्रदेशात विकासाची जी दरी निर्माण झाली व वाढली त्याच धोरणांच्या मार्गावर टीआरएसचा प्रवास चालू झाला. टीआरएसने कोणत्याही पर्यायी धोरणांच्या अंमलबजावणीचा मार्ग स्विकारला नाही आणि हेच चिंतेचे कारण आहे. एव्हढेच नव्हे तर ज्यांनी ज्यांनी सर्वसमावेशक विकासाच्या धोरणांचा प्रश्न उपस्थित केला व पर्यायी विकासाचा कार्यक्रम समोर ठेवला त्यांना तेलंगणा-विरोधक म्हणून हिणवले गेले. या सरकारच्या पुर्वसूरींचा गरीब आणि सर्वसामान्यांच्या प्रती असणारा दृष्टीकोन आणि या सरकारचा दृष्टीकोन यात जनतेला काहीच फरक जाणवेना. सरकारी योजनांतून खऱ्या लाभार्थींना लाभ होण्याऐवजी फक्त टीआरएएसच्या कार्यकर्त्यांनाच लाभ होऊ लागला. खेड्या खेड्यातून हाच खरा वादाचा मुद्दा असल्याचे पदयात्रेत जाणवत गेले.

नवजात राज्याच्या विकासाचा प्रश्न जेव्हा आला तेव्हा, जागतिक बँकेच्या मार्गदर्शनाखाली थेटपणे काम करणाऱ्या सचिवालयाने अंमलबजावणी केलेल्या सुधारणांच्या मार्गावरून मार्गक्रमण करण्याशिवाय टीआरएस सरकारपुढे कोणताच पर्याय उपलब्ध नव्हता. फक्त योजनांची नावे बदलली गेली, 'टीडीपी स्वर्णधारे'चे नाव 'टीआरएस गोल्डन तेलंगणा'! आधीच्या काँग्रेस सरकारने कंत्राटदारांच्या फायद्यासाठी 'जलायज्ञम' नावाची योजना

आणली तर टीआरएस सरकारने त्या योजनांची नावे ‘मिशन भागीरथ’ आणि ‘मिशन कार्तिकेया’ अशी बदलत तोच मार्ग चोखाळला. अविभक्त राज्यात जेव्हा टीडीपी आणि काँग्रेस सरकारसमोर मर्यादित बुडिताखाली जाणाऱ्या आणि मर्यादित अधिग्रहीत जमिनीची गरज असणाऱ्या विविध पाटबंधारे योजनांचे पर्याय ठेवले गेले, तेव्हा ती सरकारेही अस्वस्थ झाली. तशीच स्थिती आज टीआरएस सरकारची झाली आहे. तेलंगणातील शेतकरी समाज हा सामान्यत: छोटा आणि मध्यम शेतकरी आणि एस/एसटी, मागास जातीजमातील भाडेकरू असा आहे. जर शेती किफायतशिर नाही झाली तर ह्यांना सक्तीने शेती सोडावी लागेल आणि त्यांचा समावेश शेतमजूर अथवा शेती बाह्य कामगार म्हणून होईल.

केंद्र सरकारने जाहीर केलेल्या आधारभावावर काही जास्त रक्कम बोनस म्हणून शेतकऱ्याला अविभक्त राज्यात दिली जात असे. पण आता टीआरएस सरकारने त्याला कात्री लावली आहे. जो पर्यंत शेतीचा व्यवसाय किफायतशीर होत नाही तो पर्यंत तेलंगणाचे रुपांतर नंबर एकच्या राज्यात करण्याचे स्वप्न प्रत्यक्षात येणे नजीकच्या काळात तरी शक्य नाही. तेलंगणाच्या ग्रामीण भागातील नऊ जिल्ह्यांपैकी पाच जिल्ह्यात झूम शेती पसरली आहे. लाखो आदिवासी शेतकऱ्यांचे जीवनमान या शेतीवर अवलंबून आहे. ह्या पर्यावरण स्नेही शेतीचे संरक्षण करण्यासाठी पुढाकार घेण्याऐवजी टीआरएस सरकार आदिवासींना त्या जमिनींवरून हुसकावून लावत आहे व आंदोलन करणाऱ्यांना मध्ययुगीन कायद्याचा वापर करीत त्यांना जामीन न देता महिनोनमहिने तुरुंगात टाकत आहे. टीआरएस सरकारच्या सगळ्या धोरणांची अंमलबजावणी उच्च जाती आणि वर्गाचे फायदे कसे सुरक्षित राहतील याच उद्देशासाठी आहे, सामाजिक न्यायाचा मागमूसही त्या धोरणात नाही.




नंबर एक होण्याच्या सरकारच्या आकांक्षेचे मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष स्वागतच करीत आहे. पण सरकारची सारी मदार मानवी विकासाच्या क्षमता वाढविण्याच्या ऐवजी थेट विदेशी गुंतवणूकीवर आहे. राज्यात अगणित नैसर्गिक आणि मानवी स्त्रोत आहेत. टीआरएस सरकार गेले अडीच वर्षे राज्याच्या नैसर्गिक स्त्रोतांचा वापर सर्वसमावेशक विकासाच्या दृष्टीने कसा होईल हे न पाहाता, नैसर्गिक स्रोतांवर खासगी मक्तेदारी कशी निर्माण होईल हेच पाहात आहे. बंद पडलेले सार्वजनिक आणि सहकारी उद्योगधंदे पुन्हा कसे चालू होतील याकडे अग्रक्रमाने लक्ष देण्याऐवजी सरकार औद्योगिकीकरणाच्या नावाखाली कोट्यवधी शेतकऱ्यांना भूमीहीन आणि शेतमजुरांना बेरोजगार करीत, लाखो एकर सुपीक जमीन देशी आणि विदेशी खासगी भांडवलाच्या घशात घालण्याचे काम करीत आहे.

‘आम्ही सत्तेवर आल्यावर कंत्राटी आणि आऊटसोर्सींग करणारी पध्दत बंद करू’ असे निवडणूक प्रचार मोहीमेत टीआरएसने जाहीर केले होते. पण आता त्यांच्या कृतीत याचा काहीही मागमूस नाही. आपणच दिलेली निवडणूकीतील आश्वासने पायदळी तुडवत असताना दुसऱ्या बाजूला ज्या सार्वजनिक स्त्रोतांतून प्रचंड नफा कमावत असलेल्या खासगी क्षेत्रात राखीव जागांची अंमलबजावणी करण्यासाठी कोणताही पुढाकार घेताना सरकार दिसत नाही.

मानवी विकासाच्या दृष्टीने तेलंगणा हे अजूनही मागास राज्यच आहे. मानवी विकास अहवालात सुधारणा करण्याच्या दृष्टीने नुकतीच एक तज्ञांची कमिटी नेमण्यात आली होती. सध्याची धोरणे बाजूला सारल्याशिवाय मानवी विकासाची अपेक्षित पातळी काढता येणे अशक्य आहे. शिक्षण आणि आरोग्य क्षेत्र खासगी व्यवस्थापनाच्या जहागिऱ्या बनल्या आहेत. जोपर्यंत शासनव्यवस्था सार्वजनिक निधी घालून आरोग्याच्या आणि शिक्षणाच्या मूलभूत सोयी सुविधात वाढ करत नाही तोपर्यंत मानवी निर्देशांकात वाढ होऊ शकणार नाही. सर्व विभागातील विद्यार्थ्यांना समान संधी देणारी सार्वजनिक शिक्षण व्यवस्था हा शिक्षणाची गुणवत्ता वाढवण्याचा एकमात्र मार्ग आहे असे मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे ठाम मत आहे.

सामाजिक न्यायासह सर्वसमावेशक विकासाचा नमुना मांडणारा दस्तऐवज तेलंगणाच्या सामाजिक-आर्थिक स्थितीसह अशा अनेक विविध कंगोऱ्यांची चर्चा करतो. या दस्तऐवजामध्ये मांडण्यात आलेल्या संकल्पनांचा प्रचार करणे हा या पदयात्रेचा एक प्रमुख उद्देश्य आहे. प्रत्येकाला दोन बेडरूमचे घर देऊ, सर्व कंत्राटी व आउटसोर्सीग कामगारांना कायम करू, अंगणवाडी कर्मचाऱ्यांचे पगार वाढवू, मुस्लीमांसाठी आरक्षण, आदिवासी गावांना पंचायतींचा दर्जा देऊ, एसटीला प्रमाणबध्द प्रतिनिधीत्व देऊ अशी ही सर्व निवडणुकीतील आश्वासने आजही झाडाला लटकलेली फळेच आहेत.

‘गाव सुधार समिती’च्या नवीन रचनेमुळे खेडेगावांमधील निमसरंजामदारी ग्राहक संबंध तसेच चालू आहेत. स्वच्छ भारत योजनेचा गाजावाजा बराच चालला आहे, पण पदयात्रा ज्या शेकडो गावातून गेली, त्यापैकी ९० टक्के गावातून गरीब आणि सामाजिकदृष्ट्या वगळल्या गेलेल्या कुटुंबांना स्वत:च्या घरात संडासची सोय करणे शक्य नव्हते. टीआरएसच्या दृष्टीने ग्रामीण व विकासाच्या मोहीमा आणि कार्यक्रम म्हणजे केवळ नेत्यांनी मिरवून साजरे करण्याचे कार्यक्रम झाले आहेत.

पदयात्रा गेलेल्या जवळ जवळ प्रत्येक खेड्यात मनरेगा कामगारांच्या पगाराच्या थकबाकीचा प्रश्न होता. गेले सहा महिने त्यांचे पगार थकलेले आहेत. तलावांचा पुर्नविकास करण्याची योजना म्हणजे टीआरएसच्या वरीष्ठ पातळीवरील नेत्यांच्या कुटुंबियांचे जे जवळचे कंत्राटदार आहेत त्यांच्यासाठी सोन्याची खाणच बनली आहे. २०१३च्या जमीन अधिग्रहण कायद्याची पूर्णत: वाट लावण्यात आली आहे. दलित आणि इतर गरीबांच्या जमिनी विकासाच्या नावाने सर्रास सक्तीने ताब्यात घेण्यात येत आहेत तर उच्च जातीच्या आणि श्रीमंतांच्या जमिनी मात्र सुरक्षित राखण्यात येत आहेत. राज्याच्या मागासलेल्या भागातील विविध सामाजिक विभाग अजूनही

***(पान ४ पहा)***

# मुंबई शहरातील झोपडपट्टी आणि पुनर्वसनाचा प्रश्न (२)

मदन नाईक

**महाराष्ट्रातील वाढत्या शहरीकरणामुळे निर्माण झालेले प्रश्न आणि शहरी विभागात पक्षवाढीसाठी काय केले पाहिजे? या महत्त्वाच्या प्रश्नावर 'मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या महाराष्ट्र राज्य कमिटीने राज्यस्तरीय अभ्यास शिबीर भरवायचे ठरवले होते. ह्यासाठी मदन नाईक यांनी चर्चेसाठी अभ्यासपूर्ण मसुदा तयार केला होता. आजही तो अत्यंत उपयुक्त आणि आजच्या वास्तवावर प्रकाश पाडणारा आहे. तसेच तो संदर्भयुक्त दस्तऐवज आहे. त्यातील एक अंश 'जीवनमार्ग'च्या गेल्या अंकात प्रसिद्ध करण्यात आला, उर्वरित अंश या अंकात वाचकांसाठी प्रसिद्ध करत आहोत. – संपादक**

आतापर्यंत आपण झोपडपट्टी पुनवर्सन योजनेच्या सर्व अंगांचा विचार केला. शासनाकडून जाहीर झाल्यानंतर आतापर्यंत काय वाटचाल या योजनेत केली याचा विचार आता करू. १९९५ साली युती शासनातर्फे ही योजना जाहीर करण्यात आली. त्यासाठी शासनांतर्गत स्वतंत्र विभाग सुरू केला आणि शहरातील ४० लक्ष झोपडीवासियांना मोफत घरे देण्याच्या वचनाची पूर्तता केल्याबद्दल आपली पाठही थोपटून घेतली. पण आज काय चीज आहे? अगदी शासनाच्या ४० लाख लोकांना घरे देण्याच्या निर्णयाचा विचार केल्यास शासनाच्या निर्णयानुसार एका घरात पाच माणसे या हिशोबाने आज रोजी निदान ८ लाख घरे बांधून पूर्ण होऊन त्याचा ताबा झोपडीवासियांना मिळायला हवा होता. अर्थात आजमितीस शहरात सुमारे १५ ते १७ लाख झोपड्या अस्तित्वात आहेत. या सत्य परिस्थितीकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. तरीही आपण ८ लाख झोपडीवासियांचा विचार करू या. पण काय चित्र दिसते. आजमितीस शासकीय आकडेवारीनुसार फक्त ५७ हजार झोपडीवासियांना नव्या अधिकृत घरांच्या चाव्या देण्यात आल्या आहेत. अर्थात यामध्ये रस्ता रुंदीकरणामुळे बेघर झालेल्या झोपडीधारकांचा फार मोठा विभाग आहे ही गोष्ट लक्षात घेतली पाहिजे. त्यामुळे प्रत्यक्ष झोपडीवासियांच्या पुनर्वसनासाठी पूर्णत्वास नेलेल्या योजना किती आणि त्याद्वारे किती झोपडीधारकांना मोफत घरांचे वाटप करण्यात आले हा प्रश्न निर्माण होतोच?

मुळात ही झोपडपट्टी पुनर्वसन योजना काय किंवा मुंबई-पुणे दोन तासात पोहोचण्यासाठी हम रस्त्याची योजना काय. या योजनांशी सामान्य माणसांचा सुतराम सबंध नाही. हे दोन्ही प्रकल्प दोन मोठ्या उद्योगपतींनी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांना सुचविले, बाळासाहेबांच्या मनात ते ठासले आणि बाळासाहेबांनी घोषणा करून प्रकल्प जाहीर केले असा हा मामला आहे.

मुंबई-पुणे हायवे हा प्रकल्प आपणांस प्रसिद्ध उद्योगपती धीरुभाई अंबानी यांनी सुचवल्याचे बाळासाहेबांनीच एका मुलाखतीत जाहीर केले. तर एस.आर.ए. योजना अमिर नेन्सी या मुंबईतील प्रसिद्ध बिल्डरने बाळासाहेबांना सुचविल्याचे आणि या योजनेची सुरुवात युती शासनाच्या काळात कफ परेड येथील अति महागड्या जमिनीवर झाल्याचे शिवसेनेचे एकेकाळचे प्रमुख नेते छगन भुजबळ यांनी महाराष्ट्र विधानसभेतच जाहीर केले. यावरून योजना कुणासाठी राबवण्यात आल्या याचा अंदाज येतो.

मुंबई-पुणे मेगा हायवे खाजगीकरणातून तयार झाला. शासनाचा एकही पैसा खर्च झाला नाही. शासनकर्त्यांनी त्याबद्दल आपली पाठ थोपटून घेतली. पण पुढे काय? मुंबई-पुणे दोन तासात शक्य झाले खरे. पण त्याकरिता टोल किती दिवस आणि किती भरायचा? याचा काही अंदाज आहे की नाही. रस्ते बांधणीचा खर्च व्याजासह वसूल होऊन वर कोट्यवधीचा फायदा मिळाला तरी हा टोल जनतेच्या टाळक्यावर कायमचाच मारला गेला आहे. याची कल्पना करा आणि खाजगीकरणाचा फायदा कुणाला आणि कसा होतो? याचा जरा विचार करा.

तसाच प्रकार या एस.आर.ए. योजनेत आहे. या मोफत घरांच्या योजनेतही शासनातर्फे एक दमडीही खर्च होत नाही. सर्व खर्च विकासकाने करायचा आणि शासनकर्त्यांना फक्त श्रेय द्यायचे. अर्थात यामागे निराळा अर्थ व्यवहार असतो हे सांगण्याची आवश्यकता नाही. आता एवढा खर्च करून योजना साकार करायची तर खाजगी विकासक आपल्या फायद्याचे गणित आधी मांडणार आणि फायदा देणारा प्रकल्प असेल तरच तो त्यात आपली गुंतवणूक करणार ही गोष्ट ओघाने आलीच.

अमिर नेन्सी यांनीही तेच केले. शहरातील कफ परेड या अति महागड्या विभागात काही झोपड्यांचे पुनर्वसन केले आणि त्याबदल्यात शासनाकडून अडीच एफ.एस.आय. उपटला. आता कफ परेडसारख्या भागात जेथे जमिनीचा भाव २५ आणि ३० हजार रुपये प्रति चौरस फूट आहे, तेथे जमिनीच्या अडीचपट एफ.एस.आय. मिळत असल्यास कुठला विकासक मागे राहील. अमिर नेन्सी यांनी ही योजना साकारून योजनेची सुरुवात करून दिली. त्यानंतर गोरेगाव या उपनगरात (येथे ही जमिनीचे भाव चढेच आहेत) रॉयल पाम नावाची अतिआलिशान सप्ततारांकित वसाहत उभी केली आहे आणि आता तर तेथे सहार विमानतळावरून रॉयल पामपर्यंत रोप वे टाकला जाणार आहे. म्हणजे परदेशी पर्यटकांनी विमानतळावरून सरळ रॉयल पामवर यावे. हा आहे या योजनेचा अर्थ. याच्याशी सामान्य जनतेचा संबंध कसा येणार. म्हणूनच गेल्या बारा वर्षांच्या प्रदीर्घ कालावधीनंतरही काही हजार लोकांनाच या योजनेचा लाभ झाला आणि लक्षावधी झोपडीवासी आहेत त्याच अवस्थेत आहेत.

जर शासनाला खरोखरच झोपडीवासियांना चांगल्या अधिकृत घरात न्यावयाचे असेल तर अशा योजनेमध्ये जनतेचा सहभाग ही अत्यंत महत्वाची गोष्ट आहे. त्यादृष्टीने प्रयत्न होणे अत्यंत आवश्यक आहे. शासनाने आतापर्यंत अशा अनेक योजना जाहीर केल्या. परंतु त्या शासकीय दस्ताऐवज म्हणून शासकीय दप्तरातच बंदिस्त राहिल्या. यापूर्वी जाहीर झालेल्या पंतप्रधान अनुदान प्रकल्प, एस.आर.डी. योजना तसेच त्याही पूर्वी मुख्यमंत्री अंतुले यांनी जाहीर केलेला अजित केरकर अहवाल या सर्वच योजनांशी जनतेचा काहीच संबंध नव्हता, त्यामुळे त्या अपयशी ठरल्या.

आता शासनकर्त्यांना जर खरोखरच मुंबईला झोपडपट्टी मुक्त करायचे असेल तर शासनाने एक गोष्ट लक्षात घ्यायला हवी झोपडपट्टीत भिकारी रहात नाहीत. स्वाभिमानी माणसे राहतात. चांगल्या अधिकृत घरांचे स्वप्न तेही पहात असतात. पण सध्याच्या महागाईमुळे त्यांना ते परवडत नाही. म्हणून केवळ नाईलाजाने त्यांना अशा वस्त्यांमधून रहावे लागते.

म्हणूनच शासनाने जनतेच्या या मानसिकतेचा विचार करून झोपडपट्टीवासियांमध्ये काम करणाऱ्या संघटनांच्या कार्यकर्त्यांना एकत्र करून त्यांना या योजना समजावून दिल्या पाहिजेत. जनतेच्या स्वाभिमानाला फुंकर घातली पाहिजे. तसेच गृहनिर्माणाचे निरनिराळे नमुने सर्वसामान्य माणसाला परवडतील असे तज्ञ लोकांकडून तयार करून घेऊन अशा घरांना काय खर्च येणार त्याबाबत सविस्तर माहिती जनतेला दिली पाहिजे. त्यांच्या स्थानिक संघटनांना काही अधिकार देऊन स्थानिक रहिवाशांना संघटित करण्याचे आवाहन केले पाहिजे आणि जनतेचा जास्तीत जास्त सहभाग या योजनेत कसा वाढेल आणि ही योजना जास्तीत जास्त जनताभिमुख कशी होईल यादृष्टीने प्रयत्न झाले पाहिजेत.

या योजनेत शासनाला जनतेचा सहभाग हवा असेल तर त्या योजनेत बदल करणे आवश्यक आहे. सर्व प्रथम झोपडपट्ट्यांनी व्यापलेल्या जमिनी रहिवाशांच्या स्थानिक संस्थांच्या नावावर झाल्या पाहिजेत आणि त्याकरिता शासनकर्ते आणि शासकीय अधिकारी यांची मानसिकता बदलण्याची आवश्यकता आहे. तसेच सर्वसामान्य नागरिकांना परवडतील अशा गृहनिर्माणाच्या (नमुन्यासहित) अनेक योजना जनतेसमोर ठेवल्या पाहिजेत आणि त्यांना परवडतील त्या नमुन्यानुसार पसंती देण्याचा अधिकार त्यांना असला पाहिजे. केवळ एका मोजमापाची आणि नमुन्याची घरे घेण्याची सक्ती त्यांच्यावर असू नये. तसेच गृहनिर्माणासाठी आवश्यक असणाऱ्या तज्ञांची सेवा जसे सिव्हिल इंजिनीयअर, आर्किटेक्ट, त्यांना शासनाकडून मिळाला पाहिजे. गृहनिर्माण प्रकल्प परवाना पद्धत सोपी आणि सरळ केली पाहिजे. तसेच केंद्र आणि राज्य शासनाने जाहीर केलेल्या अनुदान योजनांचा फायदा जसा वाल्मिकी आंबेडकर योजना, जवाहरलाल नेहरू योजना यांचा फायदा अशा गृहनिर्माण प्रकल्पांना देऊन त्यांना आर्थिक मदत दिली पाहिजे. महापालिकेची सध्याची डोईजड कर आकारणी बदलून ती मूल्याधारित केली पाहिजे. सर्वात महत्वाचे म्हणजे मुंबई शहर हे औद्योगिक नगर होते आणि ते औद्योगिक नगरच राहिले पाहिजे. तेथे कामगार-कर्मचाऱ्यांचे वास्तव्य असले पाहिजे. स्मगलर आणि काळा बाजारवाल्यांचे व्यापार केंद्र होता कामा नये याची दक्षता शासनकर्त्यांनी घेतली तर मुंबईचा चेहरा मोहरा बदलायला वेळ लागणार नाही असा विश्वास वाटतो.

*(समाप्त)*

# जालना : सीटूच्या नेतृत्वाखाली विडी कामगारांचा मोर्चा




मराठवाडा विडी कामगार संघटना (सीटू)च्या वतीने विडी कामगारांच्या ज्वलंत मागण्यांसाठी दि. १६ जानेवारी २०१७ रोजी जालना जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. दोन महिन्यांपासून पगार नाही, हप्त्यातून फक्त दोनच दिवस काम मिळते, तेव्हा नियमित काम मिळाले पाहिजे या व इतर मागण्यांसाठी हा मोर्चा काढण्यात आला होता.

जालन्यात चार विडी कारखाने आहेत. त्यामध्ये २ हजार कामगार काम करतात. मजूर छाप विडी कारखान्यामध्ये सर्वात जास्त मजूर आहेत. त्यांना नियमित काम मिळत नाही व दोन-दोन महिने पगार नसल्यामुळे आणि नोटाबंदीमुळे तेथील कामगारांच्या कुटुंबांची उपासमार होत आहे.

माऊली विडी कारखाना व नांगर छाप कारखाना येथे मजूरांना किमान वेतन दिले जात नाही, पी. एफ. भरला जात नाही. कामगारांचे हजेरी रजिस्टर नाही, कामगारविषयक कायद्याची योग्य अंमलबजावणी या कारखान्यांमध्ये होत नाही. त्यामुळे कामगारांमध्ये प्रचंड असंतोष आहे. हिमको बिडी कामगारांनासुद्धा किमान वेतन दिले जात नाही. या सर्व प्रश्नांकडे शासनाचे लक्ष्य वेधण्यासाठी या चारही कारखान्यांतील कामगार मोठ्या संख्येने मोर्चात सामील झाले होते.

मोर्चाची सुरुवात अंबड-चौफुलीपासून झाली व त्याचा समारोप जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील जाहीर सभेत झाला. यावेळी संघटनेचे अध्यक्ष अण्णा सावंत यांचे नेतृत्वाखाली एक शिष्टमंडळ जिल्हाधिकारी यांना भेटले. निवेदनातील सर्व मागण्यांवर त्यांचेशी सविस्तर चर्चा झाली. याबाबत मालक प्रतिनिधी व शासकीय कामगार विभागाचे प्रतिनिधी यांचे बरोबर त्वरित बैठक घेऊन, मागण्यांवर सविस्तर चर्चा करून कामगारांना न्याय देवू आणि विडी कामगारांसाठी घरकुल योजना राबविण्यासाठी जमीन देवू असे आश्वासन यावेळी जिल्हाधिकारी यांनी शिष्टमंडळास दिले.

शिष्टमंडळाबरोबर झालेल्या चर्चेची माहिती अण्णा सावंत यांनी सभेत सविस्तर दिली. त्यावेळी ते म्हणाले की, सध्या नोटाबंदीमुळे विडी उद्योग अडचणीत आहे म्हणून कामगारांनी पूर्ण सहकार्य केले आहे. पण आता दोन महिन्यांपासून पगार नसल्यामुळे कामगारांची उपासमार होत आहे. आता तीन दिवसांऐवजी चार दिवस काम देण्याचे व्यवस्थापनाने मान्य केले आहे. आपल्या सर्व मागण्या टप्प्या-टप्प्याने पूर्ण होतील तरी कामगारांनी एकजूट ठेवावी व लढ्यास तयार रहावे असे त्यांनी सांगितले. यावेळी मधुकर मोकळे, सुनंदा तिडके, रमेश चिलका यांची भाषणे झाली.

मोर्चा यशस्वी करण्यासाठी नरसिंग सरगम, सविता अडियाल, सरस्वती श्रीगादी, बालमती सरगम, शोभा चिलका, संगीता गुंटूंक, जमना बिला, ओमप्रकाश यांनी परिश्रम घेतले. मोर्चामध्ये महिला कामगार मोठ्या संख्येने हजर होत्या व त्यांनी जोरदार घोषणाबाजी केली.

**– मधुकर मोकळे**